पुण्यनगरी २९.१०.२२.

# आता ‘एक देश, एक गणवेश’

## मोदींचा पोलिसांसाठी प्रस्ताव ▌ राज्यांना विचार करण्याचे आवाहन

▌ **सुरजकुंड :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी सर्व राज्यांच्या गृहमंत्र्यांना संबोधित करताना देशभरातील पोलिसांसाठी ‘एक देश, एक गणवेश’ असावा, असा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव आपण राज्यांवर लादत नसल्याचे स्पष्ट करतानाच मोदींनी याबाबत विचार करण्याचे आवाहन केले. युवकांना भरकटण्यापासून रोखण्यासाठी प्रत्येक प्रकारच्या नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्याची गरज मोदींनी व्यक्त केली.


हरयाणाच्या सुरजकुंडमध्ये सर्व राज्यांमधील गृहमंत्र्यांचे दोनदिवसीय चिंतन शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराला पंतप्रधानांनी शुक्रवारी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे संबोधित केले. यावेळी त्यांनी पोलिसांसाठी ‘वन नेशन, वन युनिफॉर्म’ म्हणजेच ‘एक देश, एक गणवेश’ ही संकल्पना मांडली. देशभरात पोलिसांची ओळख

▸▸ पान ५ वर...



### सोशल मीडिया जबाबदारीने वापरण्याचे आवाहन

मोदींनी सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले. फेक न्यूजने देशात हलकल्लोळ माजू शकतो. आपल्याकडे आलेली माहिती पुढे पाठवताना दहा वेळा विचार करायला हवा. आपण जे फॉरवर्ड करतोय त्यात कितपत तथ्य आहे, याची खातरजमा केली पाहिजे. संदेशाची सत्यता पडताळली तर तुम्हाला वेगळीच माहिती मिळेल, असे मोदी म्हणाले.



# आता ‘एक देश, एक गणवेश’

(पान १ वरून) एकसारखी असावी, असे मला वाटते. त्यासाठी मी ‘एक देश, एक गणवेश’ ही संकल्पना मांडत आहे. हा विचार मी कोणावरही लादत नाही, परंतु हे होऊ शकते. आता लगेच नाही झाले तरी येत्या ५, ५० किंवा १०० वर्षांत ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकते. यावर राज्यांनी विचार करावा, असे मोदी म्हणाले. पंतप्रधानांनी सर्व राज्यांना जुन्या कायद्यांमध्ये काळानुरूप बदल करण्याचे आवाहन केले. कायदा-सुव्यवस्था आणि सुरक्षेपुढील आव्हाने पाहता केंद्र व राज्यांमधील सुरक्षा संस्थांनी समन्वय साधून कारवाई करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. देशांतर्गत सुरक्षेसाठी राज्यांच्या पोलीस दलांनी एकमेकांना सहकार्य करणे हे घटनात्मक अनिवार्यता आणि जबाबदारी असल्याचे नमूद करत मोदींनी राज्यांना एकमेकांकडून शिकण्याचा सल्ला दिला. अलीकडे आरोपींच्या अटकेवरून दोन राज्यांमधील पोलीस दलांमध्ये उडालेला संघर्ष आणि विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांकडून सीबीआयला कारवाईसाठी पूर्व परवानगीची घालण्यात आलेली अट या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांचे हे वक्तव्य महत्त्वाचे आहे. जनतेच्या मनातील पोलिसांबद्दलचे गैरसमज दूर करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले. चिंतन शिबिरात मोदींनी अमृत काळाचा उल्लेख करत येत्या २५ वर्षांत येणारी अमृत पिढी पंचप्राण आत्मसात केलेली असेल, असे मोदींनी सांगितले. भाजप नेत्यांकडून शहरी नक्षलवादाचा मुद्दा नेहमी उपस्थित करण्यात येत असतो. याचा अप्रत्यक्ष उल्लेख करताना मोदींनी युवकांना भरकटण्यापासून रोखण्यासाठी प्रत्येक प्रकारच्या नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्याची गरज व्यक्त केली. या शिबिरात राज्यांच्या गृहमंत्र्यांसह गृहसचिव, पोलीस महासंचालक आणि निमलष्करी दलाचे महासंचालक सहभागी झाले आहेत. या दोनदिवसीय शिबिरात पोलीस दलांचे आधुनिकीकरण, सायबर गुन्हे व्यवस्थापन, गुन्ह्यांची उकल करण्यासाठी माहिती-तंत्रज्ञानाचा वापर, भू सीमा व्यवस्थापन, किनारी सुरक्षा, महिला सुरक्षा, मादक पदार्थांची तस्करी या मुद्द्यांवर चिंतन करण्यात येत आहे.

पुण्यनगरी ता. २९.१०.२२

# महाराष्ट्रात 'सायबर इंटेलिजन्स युनिट' उभारणार!

## सुरजकुंड येथील बैठकीत देवेंद्र फडणवीस यांची माहिती



**। सुरजकुंड (हरयाणा) :** सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्रात डेडिकेटेड सायबर इंटिलिजन्स युनिट स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरजकुंड येथील चिंतन शिबिरात दिली. राज्यात २० हजार पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेत देशभरातील विविध राज्यांचे गृहमंत्री आणि पोलीस महासंचालकांचे दोन दिवसांचे चिंतन शिबीर हरयाणातील सुरजकुंड येथे आयोजित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा या बैठकीला शुक्रवारी संबोधित केले. राष्ट्रीय सुरक्षेच्या अनेक विषयांवर या बैठकीत मंथन करण्यात आले. त्यावेळी फडणवीस बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, सायबर इंटिलिजन्स युनिट हा एक समर्पित सिंगल प्लॅटफॉर्म असेल. या माध्यमातून सायबर गुन्ह्यांना आळा घालणारे जागतिक मॉडेल तयार होईल. सरकारी आणि खासगी बँका, वित्तीय संस्था, सोशल मीडिया संस्था,

▸▸ पान ५ वर...

# महाराष्ट्रात 'सायबर इंटेलिजन्स युनिट' उभारणार!

(पान १ वरून) नियामक संस्था, सायबर पोलीस, तंत्रज्ञ असे सर्व या व्यासपीठावर एकत्रित राहणार असून, त्यातून गतिमान प्रतिसादाची यंत्रणा उभारण्यात येणार आहे. यात आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर असेल. अलीकडच्या काळात आर्थिक आणि सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. अन्य गुन्ह्यांच्या तुलनेत येणाऱ्या काळात कदाचित या गुन्ह्यांचीच संख्या अधिक असेल. ही संस्था आधीच त्यादृष्टीने सज्ज असेल. सीसीटीएनएसमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक गतीने कार्यवाही पूर्ण केली. ॲम्बीसच्या माध्यमांतून सुद्धा मोठी प्रगती राज्य सरकार करते आहे. सुमारे ६ लाखांहून अधिक गुन्हेगारांचे बायोमेट्रिक तयार करण्यात आले आहेत. याला सीसीटीएनएसशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे नाव बदलून अन्य राज्यांत पुन्हा गुन्हे करतात, अशांना ओळखणे आणि त्यांच्यावर कारवाई करणे सोपे होणार आहे. सीसीटीव्हीच्या जाळ्याला सायबर पोलिसांशी जोडल्यामुळे गुन्ह्यांचा तपास वेगाने होणार आहे. चालान प्रणाली आणि एकच ऑनलाइन कोर्ट यामुळे मनुष्यबळाची सुद्धा बचत होत आहे. ऑनलाइन ट्रेनिंग प्रणालीमुळे प्रशिक्षणाला गती मिळते आहे, असेही फडणवीस म्हणाले.

राज्यात २० हजार पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नक्षलवाद्यांविरुद्धच्या कारवाईला गती देण्यात आली असून, यात केंद्र सरकारची मोठी मदत मिळत आहे. शहरी नक्षलवादाचा धोका मोठा आहे. त्याविरोधात कठोर पावले उचलली जात आहेत. तांत्रिक आणि फॉरेन्सिक पुराव्यांतून अपराध सिद्धीचा दर वाढवण्याचा सातत्याने प्रयत्न होतो आहे. सागरी सुरक्षेच्या बाबतीत सुद्धा तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देण्यात येत आहे, अशीही माहिती देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिली.

### फडणवीस यांनी अमित शाहांचे मानले आभार

ही बैठक आयोजित केल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आभार मानताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोणताही गुन्हा किंवा कायदा-सुव्यवस्था हा प्रश्न केवळ कोणत्याही एका राज्याचा प्रश्न नसतो, तर अनेक राज्यांना एकाच वेळी त्याचा सामना करावा लागतो. या बैठकीच्या माध्यमातून केंद्र आणि राज्यात समन्वयाची उत्तम व्यवस्था तयार करण्यात आली, याबद्दल केंद्रीय गृहमंत्र्यांचे मी विशेष आभार मानतो.

पुण्यनगरी पु.पा.४.

# सफाई कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

**। मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर रोड, भाजी मार्केट परिसरात गुरुवारी सकाळी महापालिकेत काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्याला एका व्यक्तीने त्याच्या घराबाहेर पडलेले दगड उचलून कचरागाडीत टाकल्यामुळे अनिल पटेल या व्यक्तीने सफाई कर्मचाऱ्याला बंदूक दाखवत जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केली. त्यामुळे अनिल पटेलविरोधात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेचे सफाई कर्मचारी दळवी चाळ, नवघर रोड येथे नेहमीप्रमाणे परिसरात साफसफाई करत असताना अनिल पटेल यांच्या घराबाहेर काही मोठे दगड पडलेले होते. दगडांच्या बाजूलाच असणारा नाला साफ करायचा असल्याने स्वच्छता कर्मचारी यांनी अस्वच्छ दगड उचलून कचरा गाडीत टाकले होते. सफाई कर्मचाऱ्याने दगड कचरा गाडीत टाकल्यामुळे अनिल पटेल याला राग आला. त्यामुळे पटेल याने स्वच्छता कर्मचारी व स्वच्छता निरीक्षक यांना शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. त्यानंतर त्याने बंदूक दाखवत धमकी दिली. त्यामुळे पटेल याच्या विरोधात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पुढील तपास नवघर पोलीस करत आहेत.

पुण्यनगरी पु.पा.२.

# १ नोव्हेंबरपासून कारमध्ये सहप्रवाशांना सीटबेल्ट बंधनकारक

## टॅक्सी संघटनांचा विरोध

**। मुंबई ।** चारचाकी वाहनांमध्ये येत्या १ नोव्हेंबरपासून वाहतूक पोलिसांनी सीटबेल्टची सक्ती केली आहे. मात्र या निर्णयाला मुंबई टॅक्सीमेन्स युनियनने तीव्र विरोध केला आहे. संघटनेने या निर्णयाला विरोध असल्याचे पत्र मुंबई वाहतूक विभागाला दिले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीमध्ये अनेक अडचणी असल्याचेही संघटनेने या पत्राद्वारे स्पष्ट केले असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.


काळ्या-पिवळ्या टॅक्सीसह सर्व चारचाकी वाहनांमध्ये मागे बसलेल्या सहप्रवाशांनाही सीटबेल्ट बंधनकारक करण्यात आला आहे. १ नोव्हेंबरपासून याची अंमलबजावणी केली जाणार आहे. मात्र टॅक्सी संघटनांनी याला विरोध केला आहे. केंद्रीय धोरणाने खासगी टॅक्सीशी तुलना करू नये, असे मुंबई टॅक्सीमेन्स युनियनने वाहतूक विभागाला पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे.

मुंबई शहरात काळ्या-पिवळ्या टॅक्सी अपघाताचे प्रमाण शून्य आहे. शहरात वाहनाचा सरासरी वेग हा १२ किलोमीटरपेक्षाही कमी आहे. हे मुद्दे विचारात घेता मागील आसनावर बसलेल्या प्रवाशांना सीटबेल्ट सक्ती करू नये आणि हा केंद्रीय मोटर वाहन नियम काळ्या-पिवळ्या टॅक्सींसाठी लागू करू नये, अशी मागणी टॅक्सीमेन्स युनियनने केली आहे. मुंबईत कारमधून प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांना सीटबेल्ट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमाचे पालन करण्यासाठी कारमध्ये वाहनचालकांना आवश्यक ते बदल करावे लागणार आहेत, यासाठी वाहतूक विभागाने १ नोव्हेंबरपर्यंतची मुदत दिली आहे.

पुण्यनगरी पा.नं. II

# अल्पवयीन आरोपीला बाल न्याय कायद्यानुसार जामिनाचा अधिकार

## उच्च न्यायालयाचा निर्वाळा



**। मुंबई :** एखाद्या अल्पवयीन आरोपीवर सज्ञान व्यक्ती म्हणून खटला चालवण्याचे निर्देश देण्यात आले असले तरीही त्याला किंवा तिला बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायद्याच्या तरतुदींनुसार मिळणारे फायदे नाकारता येत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला. न्या. भारती डांगरे यांनी हा निर्वाळा देताना कायद्याच्या तरतुदींतर्गत आरोपीला जामीन मिळाल्यानंतर एखादा बालसुधार अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली कुटुंबासमवेत राहण्याचा त्याला अधिकार असल्याचे स्पष्ट करत हत्येच्या आरोपाखाली १७ वर्षीय (कथित गुन्ह्याच्या वेळी आरोपीचे वय) तरुणाला जामीन मंजूर केला.

पूर्ववैमनस्यातून अल्पवयीन आरोपीने १२ मार्च २०२० रोजी त्याच्या मित्राच्या मदतीने ओळखीच्या व्यक्तीवर चाकूने वार केले. मुंबईतील बोरिवली पोलिसांनी २०२० मध्ये त्याला अटक केली. बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायद्याच्या कलम १२ अंतर्गत कोणत्याही अल्पवयीन आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कोणत्याही तरतुदीला सामोरे न जाता जामिनावर सुटका करून बालसुधार अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली कुटुंबासमवेत राहण्याचा अधिकार आहे. मात्र, बाल न्याय मंडळाने आरोपीवर प्रौढ म्हणून खटला चालवण्याचे निर्देश देत जामीन अर्ज फेटाळला. याकडे न्यायालयाचे लक्ष वेधत उच्च न्यायालयात जामिनासाठी याचिका दाखल केली.

त्या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी पोलिसांनी जोरदार विरोध केला. गुन्हा घडला तेव्हा आरोपीचे वय १७ वर्षे, ११ महिने आणि २४ दिवस होते आणि त्याने केलेल्या कृत्याचा परिणाम समजून घेण्यास तो मानसिकदृष्ट्या प्रौढ होता, असा दावा केला. मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करण्यास नकार दिला. आरोपीला प्रौढ म्हणून खटला चालवण्याचे आदेश दिले असले तरीही तो अजूनही अल्पवयीन आहे. केवळ प्रौढ म्हणून खटला चालवण्याचे निर्देश असल्यामुळे त्याला बाल न्याय कायद्याच्या कलम १२ चा लाभ नाकारता येणार नाही, असे न्या. डांगरे यांनी स्पष्ट केले.

अल्पवयीन गुन्हेगारांना गुन्हेगारी क्षेत्रापासून प्रवृत्त करून सामाजिक, सांस्कृतिक जीवनात त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी बाल न्याय कायद्याची निर्मिती झाली आहे. या कायद्यांच्या अमलबजावणी या अल्पवयीन मुलांची काळजी, संरक्षण, उपचार, विकास आणि पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने फायदेशीर आहे. हे अधिकार याचिकाकर्त्यालाही मिळायला हवे आणि जेणेकरून तो लवकरात लवकर कुटुंबियांकडे जाऊ शकेल, असेही न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले.

आरोपीची गुन्हेगारी कृत्यात सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ आहे. गुन्हा घडला तेव्हा तो अमली पदार्थांच्या प्रभावाखाली होता, असे बालसुधार अधिकाऱ्याच्या अहवालात स्पष्ट केले आहे. औषधांचा प्रभाव आणि रागाच्या भरात हा गुन्हा घडला असून, पीडितेला मारण्याचा त्याचा कोणताही हेतू नव्हता. समुपदेशनादरम्यान आरोपीच्या वडिलांनी त्याचा ताबा घेऊन आरोग्याची देखभाल करण्याची तयारी दर्शविली आहे. त्याने दहावीपर्यंत शिक्षण घेतले असून सध्या तो सुतारकाम शिकत होता. तो समुपदेशन सत्रांनाही उपस्थित राहत असून, मुलाचे एकूण वर्तन चांगले असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आल्याने न्यायालयाने गंभीर दखल घेत आरोपीची २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक मुचलक्यावर जामिनावर सुटका करण्याचे आणि दोन महिन्यांनी एकदा बालसुधार अधिकाऱ्याच्या कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले.

लोकमत पु.पा.३.

# मीरा-भाईंदरमधील आरक्षित भूखंड विकले

## सरनाईक यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरातील शाळांसाठीची आरक्षणे शहरातील भ्रष्ट नेत्याने सत्तेचा दुरुपयोग करून पालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने खासगी लोकांना बेकायदा विकल्याची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करण्याची मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

आरक्षण क्र. २५२ वरील ५००० चौ.मी. जागा आरक्षित आहे. त्यापैकी २१४९.४६ चौ.मी. जागा महापालिकेच्या ताब्यात आली होती. आरक्षण क्र. ३२८ मधील १०,००० चौ.मी. आरक्षित जागेपैकी १३६१ चौ.मी. एवढी जागा पालिकेच्या ताब्यात आली होती. हे भूखंड पालिकेने स्वतःच्या निधीतून वा कन्स्ट्रक्शन टीडीआरद्वारे विकासकाकडून विकसित करून घेणे आवश्यक होते. एका नेत्याने पालिका अधिकाऱ्यांना हाताशी धरून राहुल

एज्युकेशन सोसायटी व विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी या खासगी शैक्षणिक संस्थांना पालिका मालकीची आरक्षणातील जागा विकली.

काही नेत्यांनी व पालिकेच्या अधिकाऱ्यांनी आपल्या फायद्यासाठी हा आरक्षण भूखंड घोटाळा केल्याचा आरोप आमदार प्रताप सरनाईक यांनी केला आहे.

### 'भूखंड पुन्हा ताब्यात घ्यावेत'

खासगी लोकांना दिलेले शाळांचे भूखंड महापालिकेच्या ताब्यात घेऊन सर्वसामान्य व गरीब विद्यार्थ्यांना त्याचा फायदा कसा होईल? यासाठी सरकारने कारवाई करावी आणि या आरक्षण भूखंड विक्रीची आर्थिक गुन्हे शाखेकडून **चौकशी करावी, अशी मागणी आ.** सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

पुढारी पु.पा.३.

# दारू पिऊन शिवीगाळ करणाऱ्यांवर गुन्हा

**मिरारोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीत गुरुवारी मध्यरात्री इंद्रलोक व विमल डेरी परिसरात दारू पिऊन रस्त्यावर दोन तरुण शिवीगाळ व मोठं मोठ्याने आरडाओरड करत असल्यामुळे नवघर पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. नवघर पोलीस ठाणे हद्दीतील इंद्रलोक व विमल डेरी परिसरात दोन तरुण दारू पिऊन रस्त्यावर शिवीगाळ व आरडाओरड करत असल्याची माहिती नवघर पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच नवघर पोलीस घटनास्थळी पोहचत त्या दोन तरुणांना ताब्यात घेतले. त्या दोघांवर नवघर पोलीस ठाण्यात दारूबंधी अधिनियम कायदा १९९८ चे कलम ८५ (१) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ प्रमाणे १२२,११७ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. नवघर पोलीस ठाणे हद्दीत दारू पिऊन कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार किंवा मस्ती करत परिसरात शांतता भंग करणाऱ्यावर कारवाई करण्यात येईल असे नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई यांनी सांगितले आहे.

सकाळ पा.नं.५

# नालासोपाऱ्यात विवाहितेवर बलात्कार

## पोलिसांसह प्रेयसीवर गुन्हा दाखल

नालासोपारा, ता. २८ (बातमीदार) : प्रेयसीच्या मदतीने नालासोपाऱ्यात एका पोलिसाने विवाहित महिलेला मद्य पाजून बलात्कार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिस कर्मचारी आणि त्याच्या प्रेयसीविरोधात नालासोपारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुल लोंढे आणि प्रिया उपाध्याय असे बलात्काराचा गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहे. राहुल लोंढे हा वसई पोलिस ठाण्यात पोलिस नाईकपदावर कार्यरत आहे. राहुल आणि प्रिया यांनी संगनमत करून ३१ वर्षीय विवाहित महिलेला नालासोपारा येथील प्रियाच्या घरी बोलावले होते. त्या ठिकाणी तिला मद्य पाजून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला असल्याचा आरोप पीडित महिलेने पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत केला आहे. तसेच कुणाला सांगितले, पीडित महिलेने हा संपूर्ण प्रकार आपल्या पतीला सांगितल्यावर पतीने ऑनलाईन ई-मेलद्वारे मुख्यमंत्री, मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालय यांच्याकडे तक्रार दाखल केल्यानंतर १८ ऑक्टोबरला नालासोपारा पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला असून सध्या दोन्ही आरोपी फरारी आहेत.

लोकसत्ता पा.नं.१२.

# पोलीस गस्त प्रभावी करण्यासाठी क्यूआर कोड

## गस्तीवरील प्रत्येक पोलिसांची माहिती, नागरिकांना फायदा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** शहरातील गस्तीवरील पोलीस कुठे गस्त घालतात? ते नेमून दिलेल्या जागेवर गस्त घालतात की नाही? याची अचूक नोंद ठेवणारी क्यू आर यंत्रणा वसई, विरार शहरातील पोलीस ठाण्यात लागू करण्यात आली आहे. यामुळे शहरातील गस्तीवरील पोलीस नेमक्या कुठल्या ठिकाणी आहे त्याची माहिती नियंत्रण कक्षाला मिळून नागरिकांना संकटकाळी तात्काळ मदत मिळणे शक्य झाले आहे.

शहरात कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. त्याचाच एक भाग म्हणून शहरात पोलीस गस्त घालण्यात येत असते. ही गस्त घालण्याचे काम बीट मार्शल करत असतात.

बीट मार्शलना कुठे गस्त घालायची तो परिसर नियुक्त केलेला असतो. त्या परिसरातील महत्त्वाची आणि संवेदनशील ठिकाणांवर ते गस्त घालत असतात, परंतु ते नेमकी कशी गस्त घालतात? त्या ठिकाणी पोहोचतात का? याची निश्चित माहिती वरिष्ठांना नसते. शहरातील पोलीस गस्त अधिक परिपूर्ण व्हावी, नागरिकांना भयमुक्त वातावरण मिळावे यासाठी मीरा - भाईंदर वसई -विरार पोलीस आयुक्तालयाने विशेष सॉफ्टवेअर विकसित केले आहे. नागपूर आणि कर्नाटक राज्याच्या धर्तीवर हे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. यामध्ये गस्तीवरील पोलिसांच्या मोबाइलमध्ये हे क्यूआर कोड सॉफ्टवेअर असणार आहे.

शहरात कुठल्या भागात कुठला पोलीस आहे याची माहिती या क्यूआर कोड संगणक प्रणालीमुळे पोलीस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षात मिळत राहणार आहे. नागरिकांनी संकटकाळी मदतीसाठी ११२ क्रमांकावर कॉल केल्यास त्या भागातील बीट मार्शलला संबंधित ठिकाणी तात्काळ पाठवता येणार आहे. याशिवाय आपल्या परिसरात कोणता पोलीस गस्तीवर आहे याची माहिती परिसरातील नागरिकांना एसएमएसद्वारे मिळत जाणार आहे. अगदी पोलिसाचे नाव, मोबाइल क्रमांक आदींची माहिती नागरिकांना मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनादेखील या पोलिसांना संपर्क करणे सोपे होणार आहे.

प्रायोगिक तत्त्वावर विरार, तुळींज आणि माणिकपूर या पोलीस ठाण्यात ही यंत्रणा राबविण्यात आल्यानंतर ती वसई आणि विरार शहरातील सर्व दहा पोलीस ठाण्यात सुरू करण्यात आली आहे. लवकरच ती मीरा भाईंदर शहरातील पोलीस ठाण्यात सुरू केली जाणार आहे.

### नियंत्रण कक्षात माहिती उपलब्ध होणार

प्रत्येक पोलीस ठाण्याच्या गस्तीवरील पोलिसांना (बीट मार्शल) दैनंदिन गस्त घालण्याची ठिकाणे (पॉइंट) नेमून दिलेले असतात. ज्यात गर्दीची ठिकाणी, बँका, शाळा महाविद्यालय परिसर, निर्जन स्थळे, धार्मिक स्थळे, प्रमुख नाके आदींचा समावेश असतो. बीट मार्शल या ठिकाणी गेल्यावर त्यांना आपल्या मोबाइलमधून क्यू आर कोड स्कॅन करावा लागतो. तो स्कॅन झाला की नियंत्रण कक्षात संबंधित ठिकाणी (पॉइंटवर) कोण पोलीस आहे याची माहिती मिळते. कुठल्या भागात कुठला पोलीस गस्तीवर आहे त्याची माहिती वरिष्ठांना मिळते. संबंधित पोलिसांनी सर्व ठिकाणी गस्त घातली का, कुठल्या मार्गाने गस्त घातली याची संपूर्ण माहिती मिळत जाणार आहे.

लोकसत्ता पा. नं. १४.

# मीरा-भाईंदर शहरात ३०७ आरक्षणे, मुर्धा गावातील कारशेडचे आरक्षण कायम

## महानगरपालिकेचा प्रारूप विकास आराखडा जाहीर

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** तब्बल पाच वर्षांच्या विलंबाने मीरा भाईंदर महानगरपालिकेचा नवा प्रारूप विकास आराखडा शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला आहे. या विकास आराखड्यात शहरातील विकासकामांसाठी ३०७ आरक्षणे राखीव ठेवण्यात आली आहेत. प्रस्तावित मेट्रो मार्गासाठी राई मुर्धा गावातील ८७ एकर जागा कारशेडसाठी कायम ठेवल्याने ग्रामस्थांमध्ये पुन्हा संतापाची लाट उसळली आहे.

मागील पाच वर्षांपासून रखडलेल्या मीरा भाईंदर शहराचा विकास आराखडा शुक्रवारी ठाण्याच्या नगररचना विभागाने प्रसिद्ध केला. महापालिकेच्या प्रारूप विकास योजनेच्या प्रस्तावामध्ये शहरातील विविध भागात उद्यान, खेळाचे मैदान, विविध शैक्षणिक- सामाजिक सुविधा, मार्केट इत्यादी सुविधांसाठी एकूण ३०७ आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली आहेत. यात नव्याने वस्तुसंग्रहालय, तारांगण, मत्स्य उद्यान, कांदळवन उद्यान आणि होतकरू महिला वस्तिगृह अशा बाबींचा समावेशदेखील करण्यात आला आहे. नियोजनाच्या दृष्टिकोनातून सेवा रस्ता , सागरी किनारा रस्ता व रस्ते रुंदीकरण प्रस्तावित आहे. या प्रारूप विकास योजनेच्या अनुषंगाने जनतेच्या काही हरकती व सूचना असल्यास त्यांनी प्रारूप विकास योजनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदवणे बंधनकारक आहे.

### कारशेडच्या जागेला विरोध

मीरा भाईंदर 'मेट्रो मार्गिका ९' प्रकल्पासाठी भाईंदर पश्चिम येथील राई-मुर्धा गावात ८७ एकर जागा राज्य शासनाने काही महिन्यांपूर्वी प्रस्तावित केली होती. या कारशेडमुळे येथील संपूर्ण गाव नष्ट होणार असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी याचा मोठ्या स्तरावर विरोध केला आहे. त्यामुळे दोन आठवड्यापूर्वीच ग्रामस्थांचे मत जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष बैठकीचे आयोजन केले होते. या वेळी त्यांनी मेट्रो कारशेडसाठी पर्यायी जागेचा शोध घेणार असल्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले होते.

### सहा गावांचा समावेश नाही

उत्तन येथील उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या सहा गावांचा समावेश मनोरंजन आणि पर्यटन क्षेत्रात करण्यात आल्यानंतर तेथील विकास हा पूर्णपणे संथ झाला आहे. त्यामुळे शासनाने या गावांना पुन्हा पालिकेत समाविष्ट करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणारे पत्र पालिकेने नुकतेच राज्याच्या नगरविकास विभागाला पाठवले आहे. त्यानुसार या गावांना पुन्हा पालिकेत समाविष्ट करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. मात्र प्रारूप आराखड्यात त्यांचा समावेश अद्यापही करण्यात आलेला नाही.

लोकसत्ता पा. नं. २०

# राज्याचे प्रकल्प पळवण्यासाठीच सत्तांतर

## माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांची टीका

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** महाविकास आघाडी सरकार असताना 'टाटा-एअरबस'चा प्रकल्प महाराष्ट्रात नागपूरमध्ये मिहान येथे उभारण्याचे ठरले होते. मात्र हा प्रकल्पही गुजरातला गेला आहे. महाराष्ट्राच्या प्रकल्पांच्या या पळवापळवीबाबत केंद्र सरकारकडे दाद मागण्याचे धाडस राज्यातील शिंदे- फडणवीस सरकार दाखविणार का, असा सवाल माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी केला आहे. राज्याचे प्रकल्प पळवण्यासाठीच सत्तांतर घडवले गेल्याचा आरोपही त्यांनी केला.

हा प्रकल्प महाराष्ट्रात उभारण्याबाबत महाविकास आघाडी सरकारच्या काळात चर्चा झाली होती. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि टाटा समूहाचे प्रमुख चंद्रशेखरन यांच्यात 'वर्षा' या मुख्यमंत्री निवासस्थानी बैठक झाली होती. नंतर नागपूर जवळील मिहान येथे हा प्रकल्प उभारण्याबाबत त्यांनी पसंतीही कळवली होती. यांसह आणखी काही प्रकल्पांबद्दल सह्याद्री अतिथीगृहावर पुन्हा बैठक झाली होती, असे देसाई म्हणाले.

### विविध सवलती तरीही...

टाटा- एअर बस प्रकल्प महाराष्ट्रात यावा यासाठी नागपूर येथील मिहानमध्ये जमीन देऊ करण्यात आली होती. टाटाच्या अधिकाऱ्यांनी मिहान येथे जाऊन जागेची पाहणी केली होती. जमिनीच्या किमतीत २५ टक्के सवलत देण्यात येणार होती आणि भांडवली गुंतवणुकीवर कर सवलत, जीएसटीमध्ये सवलत अशा अनेक कर सवलती देण्याबाबत चर्चा झाली होती, अशी माहिती उद्योग विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

म. टा. पु. पा. ९.

# गोखिवरे येथील कोंडी फुटणार?

**म. टा. वृत्तसेवा**, वसई



प्रातिनिधिक छायाचित्र

■ रस्ता रुंदीकरणासाठी पालिकेचे प्रयत्न

■ वनविभागाकडे जागेची मागणी

वसई पूर्वेकडील गोखिवरे ते रेंज ऑफिस या दरम्यान होणाऱ्या वाहतूककोंडीवर वसई-विरार महापालिकेने अखेर तोडगा काढला आहे. या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. त्यासाठी या रस्त्यालगत असलेली वन विभागाची जागा मिळावी, यासाठी पालिकेने वन विभागाकडे जागा हस्तांतरणाचा प्रस्ताव पाठवला आहे.

वसई-विरार शहरात सध्या रस्त्यावरील वाहनांची गर्दी वाढत असल्याने वाहतूक कोंडीमध्ये दररोज भर पडत आहे. वसईतील माणिकपूर, स्टेशन रस्ता, नालासोपारा तुळींज, विरार रेल्वे स्थानक परिसर या परिसरात वाहतूक कोंडी होत असते. त्यात सर्वाधिक मोठी कोंडी वसई पूर्वेकडील महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यावर होत असते. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर बेवारस वाहने, खासगी बसगाड्या उभ्या करण्यात येतात. त्यामुळे आधीच अरुंद असलेल्या रस्त्यावरील वाहतूक कोंडीत भर पडत आहे. पालिकेने याआधी कारवाई करत ही वाहने हटवली होती, मात्र पुन्हा एकदा या वाहनांची मुक्काम रस्त्यावर पडल्याचे दिसत आहे. येथील कोंडी फोडण्यासाठी पालिकेकडून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. गोखीवरे ते रेंज ऑफिसपर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे.

या रस्त्याकडेला असलेली १५ गुंठे जागा ही संजय गांधी अभयारण्याची आहे. रस्ता रुंदीकरणासाठी वन विभागाची जागा मिळवणे गरजेचे आहे. त्यामुळे वसई-विरार महापालिकेने रस्ता रुंदीकरणासाठी वन विभागाकडे जागा हस्तांतरणासाठी नुकताच हा प्रस्ताव पाठवला आहे. वनविभागाकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर जागा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करत रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार असल्याची माहिती पालिकेचे कार्यकारी अभियंता राजेंद्र लाड यांनी दिली.

**“ मुंबई-अहमदाबाद महामार्गाला जोडणाऱ्या या रस्त्यावरील कोंडी फुटावी, यासाठी पालिकेने प्रयत्न सुरू केले आहेत. या जागेच्या हस्तांतरणासाठी वन विभागाकडे प्रस्ताव पाठवला आहे. या रस्त्यालगत असलेले महावितरणचे खांब हलवण्यात यावेत, यासाठी महावितरणला कळवले आहे.**

— राजेंद्र लाड, कार्यकारी अभियंता, वसई विरार महापालिका

**वाहतूक कोंडीबाबत वाहनचालकांच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. त्यानुसार रस्ता रुंदीकरणासाठी प्रयत्न करण्याची मागणी वसई विरार महापालिकेकडे केली होती. हा रस्ता रुंद झाल्यास वाहतूक कोंडी फुटण्यास मदत होणार आहे.**

— नारायण मानकर, माजी महापौर, वसई विरार महापालिका